सिद्ध साधक साधना — —
१९/२० ऑगस्ट २०२१
प्रवचन — —

॥ श्री ॥

## ॥ अर्धनारीनटेश्वर ॥

हे अवाढव्य व दृश्य विश्व ज्याच्यापासून निर्माण होते, ज्याच्यामध्ये ते जगते आणि अखेर ज्याच्यामध्ये लीन होते असे मूलतत्त्व कोणते याचा, शोध ऋषी-जन्मभर करत राहिले. [Scientist - शोध आत बाहेर] [सातत्याने, निष्ठेने] हा शोध घेत असताना जगाला जन्माला घालणाऱ्या, व त्याचे धारणपोषण करणाऱ्या चित् शक्तीचा (शोध) साक्षात्कार त्यांना झाला———

तसेच माणसाच्या बुद्धीला सतत प्रेरणा देणारे आणि त्याच्या मनाला व इंद्रियांना अहोरात्र राबवीत ठेवणारे मूलतत्त्व कोणते, त्याचा शोध घेण्यासाठी काही ऋषी जन्मभर एकांतवासात ध्यानमग्न होऊन राहिले. सखोल व एकाग्र ध्यानामुळे त्यांची बुद्धि सूक्ष्म झाली. तरल अवस्थेमध्ये त्यांना अंतर्यामी स्फुरणाऱ्या स्वयंप्रकाश चैतन्याचा साक्षात्कार त्यांना झाला. आणि त्याचवेळी हेही समजले, जाणवले, पटले की———

विश्वाला सतत गतिमान ठेवणारे आणि माणसाला निवेत ठेवणारे चैतन्य मुळात एकरूपच आहे. माणसासकट संपूर्ण विश्वाला अंतर्यामीपणे व्यापून पुन्हा शिल्लक उरणाऱ्या या चैतन्याला ब्रह्म असे म्हणतात.

ब्रह्म म्हणजेच सद्वस्तु! ब्रह्म सन्मात्र आहे. ते सत्याचे सत्य आहे केवळ शुद्ध अस्तित्व म्हणजे ब्रह्म!

या विश्वात जे जे काही आहे. त्याच्या अस्तित्वाला ज्या असणेपणाचा आधार आहे ते ब्रह्म! ब्रह्म आहे म्हणून सर्व काही आहे. ब्रह्म नाही अशी स्थितीच नाही. ते अनादि काळापासून होते, आजही ते आहेच आणि उद्याही ते असणार आहे. सर्व काही लयाला जाईल परंतु ब्रह्म मात्र असेलच असेल. कोणतीही मानवी कल्पना ब्रह्मापर्यंत पोहोचू शकत नाही. ब्रह्माचे वर्णन आहेपणाने करता येत नाही. ते नाहीपणाने करावे लागते. [मौन] हेच ब्रह्माचे सर्वोत्तम वर्णन आहे.

© www.madhaveeragnuveer.com

वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये।
जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ।



ब्रह्म एक आहे असे म्हणणे देखील सदोष आहे म्हणून ते अद्वैत आहे असे म्हटले जाते.

उपनिषदांमध्ये ब्रह्माची 'मूर्त व अमूर्त' अशी दोन रूपे सांगितली आहेत. केवळ 'सन्मात्र ब्रह्म' हे अमूर्त रूप समजावे. ब्रह्म नाही असे ठिकाणच असित्वात नाही.

रिता ठाव या राघवेवीण नाही।

① ब्रह्म अमुक एक अशी वस्तु नाही. ② कारण ते जिच्या पोटात नाही अशी वस्तुच या ब्रह्मांडात नाही

③ ब्रह्माला काळ स्पर्श करू शकत नाही.

④ ब्रह्माची व्याख्या करता येत नाही.

⑤ ब्रह्माचे वर्णन करता येत नाही.

⑥ ब्रह्म कशासारखे नाही पण कशाहून निराळेही नाही.

⑦ ब्रह्म दृश्य नाही, अदृश्यही नाही. ते शून्यही नाही.

⑧ ते वाढत नाही, घटतही नाही.

⑨ त्याला आदि नाही, अंतही नाही.

ब्रह्म एकरस आहे. ते प्रज्ञानघन आहे. ज्ञानमय आहे.

ज्ञेयास जाणणे हा ज्ञानाचा स्वभाव आहे. इथे एका ब्रह्माशिवाय काहीच नाही. म्हणून ब्रह्म स्वतःच स्वतःला जाणते.

ब्रह्माला आपल्या ब्रह्मपणाची जाणीव झाली. म्हणजे तो ईश्वर होतो. शुद्ध ब्रह्माला स्फुरण झाले —

(कोऽहं बहुस्याम्। शुद्ध ——→ शबल झाले.

ईश्वर म्हणजे मूर्त ब्रह्म समजावे.

ईश्वर सर्वज्ञ आहे. विश्वामध्ये ज्या विविध शक्ती आढळतात त्या सर्व शक्तींचे मूळ ईश्वराच्या चित्शक्ती मध्ये आढळते. म्हणून ईश्वर सर्वशक्तिमान आहे.

ईश्वर म्हणजेच जाणीव Consciousness संवित्। ईश्वर पुल्लिंगी तर जाणीव स्त्रीलिंगी आहे. कारण तो लिंगरहित असा विलक्षण आहे. कोणत्याही लक्षणात तो बसत नाही परंतु सर्व लक्षणे त्याच्यात आहेत.

JUNE '14

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

© www.madhaveeraghuveer.com

जपाकुसुम संकाशौ मदघूर्णित लोचनौ
जगतः पितरौ वन्दे भैरवीभैरवात्मकौ ॥



ईश्वराच्या ज्ञानमय अंगाला **शिव** म्हणतात तर शक्तिमय अंगाला **शक्ती** म्हणतात.

आणि ह्यातील गंमत अशी की पूर्ण ज्ञान अपार सामर्थ्याच्या द्वारे स्वतःशीच रमते. त्या रमण्याला आनंद म्हणतात ∴ ईश्वर सच्चिदानंदस्वरूप आहे.

ईश्वर आहे तरी कसा?

सर्व उत्तम मूल्यांचे भांडार, सर्व शक्तींचे अधिष्ठान सर्व ज्ञानाचे पर्यवसान सर्व सौंदर्याचे निधान पवित्र प्रेमाची खाण सर्व कारणांचे आदिकारण परमशांतीचे निजधाम असा आहे.

☆ ईश्वराला स्वतःचा आकार नाही पण सर्व आकार त्याच्यापासून अवतरतात. निराकार म्हणजे सर्व आकारांना सामावून घेणारा!

☆ ईश्वर स्वतः काही करत नाही पण विश्वातल्या साऱ्या घटना त्याच्या सत्तेने घडतात.

☆ ईश्वर आद्य आहे पण कालचक्र त्याच्याच संमतीने फिरते. तो केवळ साक्षीपणाने प्रेरणा देतो.

☆ त्याचा कोणी जनक नाही किंवा संरक्षक नाही. तोच संपूर्ण विश्वाचा जनक व संरक्षक आहे.

☆ तो या विश्वात ओतप्रोत भरून राहिला आहे घनदाट (Dense) म्हणून तो विश्वंभर आहे.

☆ एवढा तो भरून राहिला असला तरी विश्वातील उलाढालींनी तो लिप्त होत नाही.

☆ विश्वामध्ये जे जे भव्य आहे, मानवी जीवनात जे जे दिव्य आहे आणि जे जे सुंदर आहे त्यामध्ये ऋषींना ईश्वराचे दर्शन झाले, अनुभूती आली.

© www.madhaveeraghuveer.com

APRIL '14

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

१८ ऑगस्ट २०२१

या शिव शक्तीचा खेळ म्हणजे हे विश्व।
शिवशक्तीच्या अटोलटीचा खेळ चालला भुवनपटी।
त्रिगुणाचे हे तीनच फासे, चराचरातुनि निनादती॥

मूळमायेपासून हे अवाढव्य विश्व निर्माण झाले.
या मा सा माया।

सार्धं केन च कस्यार्धं शिवयोः समरसवपुषोः।
ज्ञातुं न शक्यते लग्नमीति चैतच्छलेन मुहुः॥

कोणाचा अर्धा भाग कुणाशी संलग्न झाला आहे हे सर्वथा जाणता येत नाही. कारण त्यांच्यामध्ये द्वैताचा केवळ आभास आहे. त्यामुळे कितीही विचार केला तरी त्यांच्यातील संधीचे ज्ञान होणे शक्य नाही. इतके ते एकमेकात मिसळले आहेत. प्रकृति आणि पुरुष म्हणजेच जड आणि चैतन्य असे अंश किंवा भाग परस्परमिश्रित अशा दोन रूपांनी भासतात. वस्तुतः त्यात द्वैतरूपता नाही. सत्तास्फूर्ति हे लक्षण त्या दोघांमध्ये आहेच. त्यामुळे यथार्थ म्हणून जरी ते दोन भासले तरी संरवोन ते दोन नाहीत.

असे जरी असले तरी त्यांना एक म्हणणे हे देखील त्यांना कमीपणा आणणारे आहे. म्हणून त्यांना 'अद्वैत' म्हटले जाते.

त्याचप्रमाणे 'स्वयंभू' हा शब्द देखील त्या कमलाला कमीपणा आणणारा आहे. कारण 'भू' म्हणजे होणे आणि ते केवळ तर आहेच आहे ते नव्हते अशी स्थितीच कधीही नव्हती. ते आहेच.

Being & Becoming मध्ये फरक आहे. जे नव्हते ते नंतर होते.
नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः।
सद्‌चा कधी अभाव नसतो

©www.madhaveeraghuveer.com

अद्वैतमात्मनस्तत्त्वं दर्शयन्तौ मिथस्तराम् ।
तौ नन्दे जगतामाद्यौ तयो साक्षाभिपत्तये ॥

हे पुरुष-प्रकृतिचे तत्त्व सामान्य बुद्धीला काही चटकन आकलन होत नाही. परंतु त्यासाठी त्यांनाच शरण जायला हवे. आपणामध्ये परस्पर अद्वैत आहे हे दर्शविणाऱ्या त्या प्रकृति पुरुषांना म्हणजेच या अनंत जगताच्या मातापित्यांना मी वंदन करत आहे.

शिव शक्तीचे सामरस्य / समावेशन ----

जो प्रीयुचे प्राणेश्वरी । उलथे आवडीचिये सरोभरी ।
चारुस्थळी एकाहारी । एका अंगाची ॥ अमृतानुभव-२

त्या 'पुरुषामध्ये' 'मलाच मी उपभोग घ्यावा' अशी आवड उत्पन्न झाली आणि त्या भरात तो आपणच प्राणेश्वरी म्हणजे प्रकृतिच्या रूपाने (उलट) सन्मुख झाला. म्हणजे आपणच आपला दृश्य विषय झाला. थोडक्यात आपले मुखसौंदर्य बघण्याविषयी आवड उत्पन्न झाल्यावर तो आरशाच्या योगाने (प्रतिबिंबरूपाने) उलटला.

हा सारा व्यवहार ज्या अधिष्ठानावर झाला ते तात्विकस्वरूप म्हणजेच परब्रह्म / एका ब्रह्मचैतन्यस्वरूप पुरुष व प्रकृति या कल्पना साकारतात. उभयतांमध्ये एका ब्रह्मचैतन्याचीच सत्ता आहे. ते अनादि एकपणाने नांदत आहेत.

जया एके सत्तेचे बैसणे । दोघा एक प्रकाशाचे लेणे ।
जे अनादी एकपणे । नांदती दोघे ॥ ना अमृत---
जिहि एकएकावीण । न कीजे तृणाचेहि निर्माण ।
जिये दोघे जीवप्राण । जिया दोघा ।

हे प्रकृतिपुरुष एकमेकांवाचून गवताची काडी देखील निर्माण करत नाहीत. त्यांतही नामरूपाच्या भावाने प्रकृति असते आणि आस्ते भानितेन्द्रिय रूपाने पुरुषही आहे. त्या अर्थाने ही दोघे एकमेकांचे जीवप्राण आहेत.

APRIL '14

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

© www.madhaveeraghuveer.com

व्यवहारातही अशी जोडपी आपल्याला दिसतात, जे एकमेकांच्या संमती/विचाराशिवाय कोणतीही गोष्ट करत नाहीत. तेव्हा आपण त्यांना 'जीवप्राण' म्हणतो. लक्ष्मीनारायणाचा जोडा म्हणतो. अशा काही जोड्या
शिव शक्ती | प्रकृति - पुरुष | गणेश - शारदा
ब्रह्म माया | प्राण - रयी | Energy - Matter.
हे दोघेही एकमेकांमध्ये अगदी मिसळून गेले आहेत हे सांगताना माऊली म्हणते --- अमृतानुभव ---

दो दांडी एक सुती | दोही फुली एक होते |
दोहो दिवि एक दीप्ती | एकाचि ओवी ||१८||
दो ओठी एक गोष्टी | दो डोळा एकी दृष्टी |
तेवी दोघी जिही सृष्टी | एकीचि जे ||१९||

दोन टिपऱ्या एक नाद
दोन दांड्याने एक विणा
दोन फुलांनी एकच सुगंध
दोन दिव्यांनी एकच प्रकाश
दोन ओठांनी एकच शब्द
दोन डोळ्यांनी एकच दृश्य
तसेच या दोघांच्या संयोगाने एकच सृष्टी निर्माण होते.

चाऊनि सोलीव पण | एकरसाचे आरोगण |
करीत आहे म्हणून | अनादि जो ||

अनादिकालापासून हे जोडपे - एकाच परब्रह्मरसाच्या उपभोगाधीन आहेत. दोघांमध्ये परब्रह्माचेच अस्तिभातिप्रियत्व आहे.

गोडी आणि गुळु | कापूर आणि परिमळु
निवडू जाता पांगुळु | निवाडु होय |

या दोन्ही गोष्टी एकमेकांपासून वेगळ्या करता येत नाही. तिथे निवडण्याची क्रिया पांगळी होते. कुंठित होते.

अर्धनारीनटेश्वर ———> श्लोक ---

JUNE '14

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

© www.madhaveeraghuveer.com

१८ ऑगस्ट-२०२१

18 SUNDAY MAY 138-227 Week 20 2014

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि।
विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसम्भवान्॥

प्रकृति म्हणजेच त्रिगुणमयी माया आणि क्षेत्रज्ञ यांना तू अनादि आहेत असे जाण. रागद्वेषादि विकार आणि त्रिगुण हे प्रकृतिपासूनच निर्माण होतात.

अमृतानुभव —— शिव शक्ती

१५ पुरुषोत्तम योग —— अक्षर क्षर पुरुष

७ ज्ञानविज्ञान योग —— परा अपरा प्रकृति

८ अक्षरब्रह्म योग — अधियज्ञ (चैतन्य) अधिभूत (जड सृष्टी)

१३ क्षेत्रक्षेत्रज्ञ विभाग — पुरुष प्रकृति

त्याला पुरुष का म्हटले आहे?

सूर्य हा स्वतः काहीही करत नाही परंतु त्याच्या अस्तित्वाने सर्व व्यापार चालतात. त्याप्रमाणे आत्मा हा शरीरात (निजल्यासारखा शेजे) आहे.

पुरि शेते इति पुरुषः।

तो आत्मा (पुरुष) प्रकृतिशी एकपत्नीव्रताने वागतो
पुरुष आणि प्रकृति [illegible] एकमेकांना [illegible]
आत्मरसाचा अनुभव घेत आहेत.

वास्तविक काठ ही पाण्याचे अस्तित्व घेऊन भासते तसा पुरुष प्रकट होतो तो प्रकृतिच्या रूपाने! ती जर नसती तर त्याच्याकडे सर्वकर्तेपणा आलाच नसता. तिच्याशिवाय तो प्रकट होऊ शकत नाही आणि त्याच्याशिवाय तिला अस्तित्वच नाही.

Without her he can not manifest
" him she doesn't exist.

आत्मा आपणहून एक टाचणी देखील उचलू शकत नाही. त्याला प्रकृतीची मदत लागतेच. प्रकृतीच पुरुषाच्या मदतीने या अवाढव्य घटना घडवत असते.

अघटित घटना पटीयसी माया।

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

APRIL '14

© www.madhaveeraghuveer.com

Replica – पती पत्नी। नटण्या मुरडण्याची, सजण्या सजवण्याची हौस स्त्रियानाच असते. मात्र पुरुष हा संसारात असावा लागतो. तो नसेल तर काहीच अर्थ नाही. सर्व काही त्याच्या साठी अन् त्याच्यामुळे. स्त्रीच्या वेषभूषा, अलंकारांवरून पुरुषाचे कर्तृत्व ऐश्वर्य समजते. नसेच या विविधरंगी सृष्टीमुळे त्या मागचे चैतन्य तत्त्व आकलन होते. कारण तोच सर्व करून अकर्ता आहे. तो नसता तर सृष्टी निर्जीव झाली असती.

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन् गर्भं दधाम्यहम्।
सम्भवः सर्वभूतानां ततो भवति भारत॥

त्रिगुणात्मक मायेमध्ये चिदाभासरूपी बीर्याचे सिंचन करून ईश्वर ही दृश्य सृष्टी निर्माण करतो.

या कारणे मी पिता। महद्ब्रह्म माता।
अपत्य षड्गुणा। जगदीश्वर॥

पुरुष प्रकृतिच्या मीलनातून हे विश्व निर्माण झाले त्यामुळे त्या दोघांचाही आदर करावा.

प्रकृतिसारखे चालावे। परी अंतरी शाश्वत ओळखावे)
सत्य होऊनी वर्तावे। लोकांऐसे॥

जाणत्या पुरुषाने देहाने वागताना अशाश्वत प्रकृतीप्रमाणे वागावे. मात्र अंतर्यामी शाश्वत ब्रह्म ओळखून असावे. आतून ब्रह्मस्वरूप असावे मात्र बाहेरून चारचौघांसारखे वागावे.

अंतरत्यागी बहिर्भोगी लोके विहर राघव।
आतून कीर्तन वरून तमाशा॥

कुर्याद् विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम्।

दृश्य प्रकृती ही केळीच्या खुंटाप्रमाणे आहे सर्व सोपट सोडून काढल्यावर त्याचा अवशेष पोकळीच रहाते. त्या पोकळीत महदाकाश दिसणे स्वाभाविक आहे. तसा तो चैतन्य स्वरूप पुरुष आहे.

JUNE '14

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

JUNE

© www.madhaveeraghuveer.com

आदर्श पत्नी / सहचारिणी

या राका शशिशोभना गतघना सा यामिनी यामिनी ।
9 या सौन्दर्यगुणान्विता पतिरता सा कामिनी कामिनी ।
या गोविन्दरसप्रमोदमधुरा सा माधुरी माधुरी
10 या लोकद्वयसाधनी तनुभृता सा चातुरी चातुरी ॥

महिम्न
11 ध्रुवं कश्चित् सर्वं सकलमपरस्त्वध्रुवमिदम् ।
परो ध्रौव्याध्रौव्ये जगति गदति व्यस्तविषये ।
12 समस्ते ऽप्येतस्मिन् पुरमथन तैर्विस्मित इव
स्तुवन् जिह्रेमि त्वां न खलु ननु धृष्टा मुखरता ॥

1

पार्वतीलास्य
2 लसत्कटिका विलोल मौलिकालि शोभना
लयोर्मिलालितांगहार मालिका मनोहरा ।
3 धिमिन् नागिन् धिमिन् नागिन् धिमिन् नागिन् निनादनन्
मृदंगसंगिनी नमोनु पार्वती सदाशिवम् ॥

4

5

वक्रतुण्ड
6 अज्ञानतिमिरान्धस्य
केयूरौ
वागर्थाविव सम्पृक्तौ वागर्थप्रतिपत्तये ।
जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ॥
जपाकुसुमसंकाशौ मदघूर्णितलोचनौ ।
जगतः पितरौ वन्दे भैरवीभैरवात्मकौ ॥

© www.madhaveeraghuveer.com

APRIL '14

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |
| S | M | T | W | T | F | S |